प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेता नाशिक एच.ओ. मधून वितरित केला जातो.
सवलतीच्या दराची तिकीटे लावून पोस्टाने पाठविण्याचा परवाना REGD-NSK/२८९/२०१९-२१
रजि. नंबर आर. एन. २१४०२/१९७५ रजिस्टर्ड वुईथ रजिस्टार ऑफ न्यूजपेपर इंडिया

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक

रजि. नं. इ-२८२

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिकचे मासिक मुखपत्र

# सन्मार्गमित्र

सन्मार्ग दर्शयत सम्यक। प्रेरयेत निजकर्मणी। सन्मार्गमित्रं सर्वेषाम। भयता आनंद वर्धनम् ।।




नाशिक । वर्ष ५२ वे । अंक १ । मार्च २०२३ (मासिक) । मूल्य १० रुपये



## दिन विशेष

२७ मार्च :– जागतिक रंगमंच दिन
१ एप्रिल :– एप्रिल फूल दिन
२ एप्रिल :– जागतिक आत्मकेंद्रीपणा जागरूकता दिन
३ एप्रिल :– छत्रपती शिवाजी महाराज पुण्यदिन
७ एप्रिल :– जागतिक आरोग्य दिन
८ एप्रिल :– आंतरराष्ट्रीय रोमानी दिन
९ एप्रिल :– जलसंधारण दिन
११ एप्रिल :– जागतिक पार्किन्सन दिन
१३ एप्रिल :– जालियनवाला बाग स्मृतीदिन
१४ एप्रिल :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती
१५ एप्रिल :– जागतिक कला दिन
१५ एप्रिल :– जागतिक सांस्कृतिक दिन
१६ एप्रिल :– जागतिक ध्वनी दिन
१७ एप्रिल :– जागतिक हिमोफेलिया दिन
१८ एप्रिल :– आंतरराष्ट्रीय स्मारके व जागा दिन
२१ एप्रिल :– भारतीय नागरी सेवा दिन
२२ एप्रिल :– जागतिक पृथ्वी दिन
२३ एप्रिल :– जागतिक पुस्तक दिन
२३ एप्रिल :– इंग्रजी भाषा दिन
२४ एप्रिल :– भारतीय पंचायती राज दिन
२५ एप्रिल :– जागतिक मलेरिया दिन
२६ एप्रिल :– जागतिक बौद्धिक मालमत्ता दिन
२९ एप्रिल :– आंतरराष्ट्रीय नृत्य दिन
३० एप्रिल :– आंतरराष्ट्रीय जाझ संगीत दिन

## सणवार

३० मार्च : – श्री राम नवमी
४ एप्रिल : – महावीर जयंती
६ एप्रिल : – हनुमान जयंती
७ एप्रिल : – गुड फ्रायडे
९ एप्रिल : – संकष्टी चतुर्थी, ईस्टर संडे
१४ एप्रिल : – भारतरत्न डॉ. आंबेडकर जयंती
२२ एप्रिल : – अक्षय्य तृतीया , रामजान ईद

## सर्व संभासदाना आणि वाचकांना विनम्र विनंती

संस्थेची वार्षिक सभासद वर्गणी (₹५००/–) तसेच सन्मार्गमित्र ची वार्षिक वर्गणी (₹१००/–) असे एकूण ₹६००/– किंवा प्रत्येकी, खाली दिलेल्या बँकेच्या खात्यात भरून आम्हाला सहकार्य करावे.

**बँकेचे नाव : बँक ओफ बडोदा , गोल्फ क्लब , नाशिक**

**खात्याचा प्रकार : बचत खाते**

**खात्याचे नाव:अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था , नाशिक ,**

**अकाऊंट नं :१७६६०१०००१४६४७**

**आय. एफ. एस. सी. कोड : BARB 0GOLFCL**

संस्थेची वार्षिक सभासद वर्गणी जमा केल्याची माहिती संस्थेचे **कोषाध्यक्ष अनिल मोहिनीराज देशपांडे,** यांना " 9423034689"नं वर मेसेज द्वारे कळवावे. तसेच सन्मार्गमित्र अंकांची वार्षिक वर्गणी जमा केल्याची माहिती **संपादक सौ. अपर्णा मोडक** यांना "८६०५५६६१२८" वर मेसेज द्वारे कळवावे.


## विघ्नहर्ता वधु - वर सहायक मंडळ

**नाव नोंदणी फक्त वेबसाईटवर**
**ऑनलाईन पद्धतीनेच करता येणार आहे.**
**अधिक माहिती साठी वेबसाईट:**
**vighnahartamatrimony.com**
नवरात्र आणि दिवाळी निमित्त खास ऑफर
ऑनलाइन रजिस्ट्रेशन फक्त रु ५००/–
आजच ह्या विशेष सवलतीचा लाभ घ्या.
वर दिलेल्या लिंक वर क्लिक करा
**नावनोंदणी पुढील १ वर्षासाठी असेल.**

मासिक

# सन्मार्गमित्र

दर महिन्याच्या २५ तारखेला प्रसिद्ध होणारे संस्थेचे मुखपत्र
वार्षिक वर्गणी रुपये १००/-
अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक
जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबलजवळ,
त्र्यंबकरोड, नाशिक ४२२००२.
फोन: ०२५३-२३१३५९९
website: www.abmsanstha.org
**email:** sanmargmitra2021@gmail.com

**संपादक : सौ. अपर्णा मोडक**
**प्रकाशक :श्री. उदयकुमार मुंगी**

सन्मार्गमित्र हे मासिक मालक अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था यांच्यासाठी प्रकाशक उदयकुमार दत्तात्रय मुंगी यांनी पुणे येथून पिडिएफ स्वरुपात तयार करुन (छापून) अखिल ब्राह्मण मध्यवर्ती जलशुद्धीकरण केंद्राजवळ, त्र्यंबकरोड, नाशिक: ४२२००२ येथे प्रसिद्ध केला. (या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक आणि अ.ब्रा. म. संस्था सहमत असेलच असे नाही)

## सन्मार्गमित्र

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक
सर्व कार्यकारिणी सदस्य व सभासद

आपल्याला वाचनाचा कंटाळा येतो, पुरेसा वेळ नसतो, वाचन केले की डोळ्यांची जळजळ होते. काळजी नसावी. खास आपल्या सोईसाठी, लेखकांच्या / संकलकांच्या आवाजात/ शैलीमध्ये. ज्या लेखाच्या (मंथळ्याच्या) नावाखाली निळ्या रंगात एक ओळ असेल त्यावर क्लिक (टच) केल्यावर आल्याला थेट आपल्या यू ट्यूब चॅनल वरील त्या विशिष्ठ लेखा पर्यन्त पोहोचता येईल.

आणि असेच आपले लेख लेखकाच्या आवाजात ऐकण्यासाठी ते आपल्या सुस्पष्ट आवाजात रेकॉर्ड करून आम्हाला पाठवावेत सन्मार्ग मित्राच्या ऑफिशियल ई-मेल आयडीवर वर पाठवा.
(sanmargmitra2021@gmail.com)

**संपादक : सौ. अपर्णा मोडक**

सन्मार्गमित्र
अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक

## सभासदांना सूचना

सन्मार्ग मित्र या अंकासाठी आपले लेख पाठविताना लक्षात ठेवून करायच्या गोष्टी :

१. आपले लेख मराठी भाषेतच असावेत. शक्यतो टाईप केलेले किंवा सुवाच्च अक्षरातील असावेत.
२. राजकिय विषय सोडून कोणत्याही प्रकारचे लिखाण पाठवावे.
३. प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपर्यंत खाली नमूद केलेल्या ई-मेल आयडी आणि व्हॉटस् ॲप क्रमांकावर आपले लिखाण पाठवावे.
४. मासिकाच्या ध्येय धोरणाला अनुसरून लिखाणामध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार संपादकांनी राखून ठेवला आहे.
५. लिखाण स्वीकृत अगर अस्वीकृत करणे संपादकांच्या अधिकारात राहिल. अग्राह्य लिखाणास कारण देण्याचे बंधन संपादकांवर नाही. तसेच लिखाणास कोणतेही मानधन दिले जाणार नाही.
६. मासिकात व्यक्त होणाऱ्या मतांशी संस्था किंवा संपादक सहमत असतीलच असे नाही.

**व्हॉटस् ॲप नं.:८६०५५६६१२८ इमेल आयडी : sanmargmitra2021@gmail.com**

**मुलं आणि पालक यांच्यातील चुकलेला संवाद.**

किती तरी आयुष्ये उद्ध्वस्त केली या न घडून आलेल्या संवादाने. काहींना जगावस वा टल नाही त्यांनी थेट आत्महत्या केल्या. आणि ज्यांना जगायची थोडीफार आस होती त्यांना या न घडलेल्या संवादाने घरापासून कायमच दूर केल. आपण आजही जेवढ्या सहजतेने हा विषय बोलतो किंवा व्यक्त करतो त्यापेक्षा कितीतरी पटींनी त्याची तीव्रता अधिक आहे.

डीयर जिंदंगी या चित्रपटातले वाक्य होत की, आपण बाह्यंगावर झालेल्या इजांवर उपाय त्वरीत करतो पण मेंदूला होत असलेल्या त्रासाकडे आपण दुर्लक्ष करतो. याच कारण म्हणजे आम्हाला मानसिक स्वास्थ्य म्हणजे लाजीरवाणी गोष्ट वाटते. म्हणजे मुलं व पालक यांच्यातील चुकलेल्या संवादाचे बळी काही वेळा मानसिकरित्या जातात. मी अशा काही केसेस पाहिल्या आहेत. काहींची मानसिक अवस्था इतकी बिघडते की, मुल आत्महत्या करण्यापुर्वी चिठ्ठीही लिहू शकत नाहीत. ( सर्वच आत्महत्या अशा असतात अस नाही ). जाऊद्या पण सध्याच्या पिढीला आणि पालकांना या गोष्टींवर विचार करायला वेळ कुठे आहे म्हणा...

आम्ही दरवेळी काहीही झाल तरी एवढंच पाठ केलेल असतं की, आम्ही मुलांसाठी जीवाच रान करतो तर मुलांनी आमच ऐकायला नको? पण मला वाटत तुम्ही जे करता ते मुलांपर्यंत पोहोचवा की. आणि प्रश्न मुलांच्या आयुष्याचा असतो तर त्यांच्या निर्णयावर त्यांना पुढे जाण्यास मदत करा. कधीकधी एक सहानुभूतीचा हात खूप गरजेचा असतो. सध्या नवीन पिढी चंगळवादाच्या आहरी जाते आहे याला नकळत कारण पालक आणि मुल यांच्यातला तुटलेला संवाद आहे. मुंबई–पुणे यांसारख्या बड्या शहरातली मुल ड्रग्जच्या आहरी जातात, गुन्हेगारी क्षेत्राकडे वळतात या प्रत्येकाला कुठेतरी कारण तुटलेला संवाद आहे हे मान्य करावच लागेल.

मी ही गोष्ट मान्य करते की काही पालक मुलांचे मित्र होण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात. परंतु काही गोष्टीत त्रुटी राहून जातात. मला मुलांना हेही सांगायचंय की, ठरावीक क्षणी तुम्हीही संवादासाठी पुढाकार घ्यायला हवा. टाळी ज्याप्रमाणे एकहाती वाजत नाही त्याचप्रमाणे मला वाटत की, मुलं–पालक संवादासाठी ठराविक वयात आल्यावर पालकांबरोबरच मुलांनीही संवादासाठी पुढाकार घ्यायला हवाच.

मुलं आणि पालक यांच्यातील संवादाचा विचार करताना प्रथम पालकांचा (कुटुंबीयांचा) एकमेकांशी संवाद कसा आहे....इकडून खरी सुरवात होते.

आज जर घरातील चित्र पाहिले तर सर्वसाधारण असे असते कोणी तरी टीव्ही मध्ये बिझी.. तर कोणी मोबाईलवर बिझी.. तर कोणी लॅपटॉप –कॉम्प्युटर वर बिझी...कोणाचा अभ्यास तर कोणी घरातील इतर कामे आवरण्यात बिझी...एकूणच सर्वच आपल्या कामात मशगुल ... आजकाल एकत्र जेवणारे कुटुंब शोधून सापडणार नाही. असे असताना.. एकत्र जेवायला बसले तरी टीव्ही सुरुच असेल...मग या सर्व बिझी शेड्युल मध्ये नेमका सवांद होणार कधी????

एकमेकांशी बोलले तरी बोलणं म्हणजे "मला टिफिन दे... आज उशीर होईल... उद्या लवकर उठव..मला पैसे पाहिजे...याच बिल भर...येताना भाजी घेऊन ये. मला वेळ नाही." .......

या अश्या बोलण्याला सवांद म्हणता येणार नाही...ही सर्व त्या कामाविषयीची इंडिकेटर म्हणू शकतो....

जर पालकच असे वर्तन करत असतील, तर मुलं देखील हेच अनुकरण करणार.

मग बालक सवांद म्हणजे नेमका काय? हे कसे व कुठें शिकणार???

शाळा कॉलेज मध्ये अभ्यास शिकवला जातो...पण मनातील भावना व्यक्त करणे ... मनसोक्त बोलणे...मनापासून ऐकणे...एकमेकांना समजून घेणे... विश्वास जपणे... मानसिक विकास करणे या सर्व गोष्टी संवादातून आपल्यात विकसित होत असतात.

पालक बालक सवांद असो किंवा पालकांचा एकमेकांशी सवांद... कुटुंबातील लहान लहान प्रश्न देखील सवांद नसल्यांस गंभीर बनत आहेत... बालके अगदी शुल्लक अपयश पचवणे ही सहन करू शकत नाही. कधी चुकीच्या वळणावर जाऊन पोहचतात हे त्यांना समजतही नाही.

बालक पालक सवांद गरजेचा आहे. पण याची मूळ सुरवात पालकांचा एकमेकांशी असलेल्या सवांदापासून झाली पाहिजे.

शेवटी इतकंच सांगेन की, जसं पेराल तसं उगवेल.

आज़ मुलांशी बोला , त्यांच्याशी संवाद साधा , उद्या म्हातारपणी मुल तुमच्याशी संवाद साधतील. आणी हे वास्तव आहे .मुल म्हणजे म्हणजे एक छोटासा कॅमेरा आहे . ते प्रत्येक गोष्ट आपल्या आई वडीलांची आत्मसात करत असतात .आई वडील जसे वागतात , लहान मुलही तस वागण्याचा प्रयत्न करत

असतात .

आजकालच्या जीन्स पँट व टी शर्टच्या जमान्यातील मम्मीकडून मायेचा पदर केव्हाच मुलांच्या डोक्यावरुंन हरवला आहे .मोबाईल आणी इंटरनेटच्या जमान्यात , पप्पा सतत मोबाईलवर व्यस्त असल्याने , आता आशीर्वादरूपी पित्याचा हाथही मिळेना .सवांद तर गमावलाच या चिमुकल्या जीवांनी परंतु त्याच बरोबर बदलत्या काळात मायेच्या ओलाव्याला सुधा पोरकी झाली ही लहानगी मुल .

एकत्रित कुटुंब नसल्याने आजी आजोबा इतिहासजमाच झालेत. आजची संस्कृती म्हणजे, आम्हीं दोन आमचे दोन , आमचा होतो एक चौकोन , चौकोनातील जातात दोन मग उरलेल्याना आधार कोण ?

अशी परिस्थिती आहे.आई वडील शहरी भागात दोघंही जॉब करतात , कारण खुप पैसा कमवायचा असतो. कमवने म्हणजे वाईट गोष्ट नाही , जरूर कमवा, खूप कमवा, पण ज्याच्यासाठी कमवत आहात ना ! त्याला पैशा पेक्षा लहानपणात आधाराची , पपाबरोबर खुप खुप गपा मारण्याची , मम्मीशी शाळेतील गमती – जमती संगाव्याशा वाटत असतात त्या लहान जीवाला .

आपण फक्त दोन – तीनच गोष्टी मुलांना विचारतो , परीक्षा कधी आहे? ...किती मार्क मिळाले..? ..अभ्यास झाला का ? काय हे ! या लहान मुलाला जन्म देण्यामाघे फक्त एवढाच उद्देश होता काय ?

लहानांनी मोठ व्हाव अस वाटेत असेल तर ..मोठ्यानी सुधा काही काळ लहान व्हाव लागत नेमकं हे सूत्रच आम्हीं विसरत चाललोय .त्यामुळेच आजकाल मुल नैराश्याच्या अंधाऱ्या खाइत ढकलले चाललेत. .

मित्रांनो स्वामी विवेकानंद , एडिसन , राष्ट्रपती कलाम साहेब ,असे इतर महापुरुष ..कुटुंबातील संवादाने व आई वडिलांनच्या वैचारिक प्रेरणेनेच महान बनू शकले व महान कार्य करू शकले....चला तर मग आपणही आपल्या मुलांबरोबर सवांद साधुया.

आधुनिकीतेच्या जगात व्यस्त होते. सगळे बोलण्याचे साधन जिथे दूरध्वनी बनले. थकले जीव जेव्हा घरट्याकडे परतले. पिल्लांपाशी बागडण्या ऐवजी मोबाइलमध्ये गुंतले...

१. ममता– माया पाळणाघरे वा आयांपाशी थांबले भक्कमतेच्या सावल्यांना वृध्दाश्रमात नेऊन बसविले आणी आधुनिक युगात कुटुंबाचे रुपच पालटले आशा अन् अपेक्षाच्या ओझ्यानं कुणी प्राणास मुकले...

२. दडपशाहीच्या भावनेनं विक्षिप्तावाणी एकटे होऊन पडले जुन्या सोबत नवं स्वीकारतांना बालपण हरवले.
नात्यांचे पाश आता स्पर्धेत रंगले जिंकण्याच्या आशेत आपलेपणाने खेळणं विसरले...

३. तू..तू..मी.. मी.. करता करता पाखरांच्या भांडणात पिल्लांचे अस्तित्व हरवले.स्वातंत्र्याचे अर्थ स्वैराचारात बदलले, आणी मोकळे पणाने जगण्यांचा आनंद घेणं विसरले...

४. धाक हा डोळ्यात असावा व प्रेम हे वाणीत असले पाहिजे. काही पालक आपल्या मुलांत सुधारणा व्हावी म्हणून कधी कधी त्यांना मारतात. मला कोणत्याही चुकीचे समर्थन करायचे नाही, पण मुलांना मारणे ही त्यांच्या चुकीची शिक्षा वा दंड नाही तर त्याने ती चुक का केली हे समजून घेऊन त्याला समजावून सांगणे जेणेकरुन तो चुक परत करणार नाही.जगण्याचं कौशल्य शिकणे हिच आजच्या काळाची गरज आहे.तरच तुम्ही आनंदाने सुखी जीवन जगू शकता.म्हणून नेहमी चांगल्या बाबीच मुलांसमोर करायच्या.

बरेच पालक बहुधा आपल्या मुलांकडे माझा मुलगा हा आमच्या म्हातारपणातील काठी आहे अश्या नजरेने पाहत असतात परंतु हे पूर्णत: चुकीचे आहे, उलट त्याच्या मधील सुप्त गुणानां ओळखून त्याच्यात असलेल्या कला गुणानां वाव द्या खेळ, कला, वैगरे मध्ये असलेले त्याचे छंद जोपासा. त्यांना इतरांचा मान सन्मान करायला शिकवा ,काही खरेदी करताना त्यांना सोबत घेऊन जा यामुळे त्यांच्या आवडी निवडी जोपासल्या जातील.

त्यांच्यावर संस्कार लादू नका उलट आपल्या चांगल्या बोलण्या ,वागण्यातुन व व्यवहारातून मुलांना संस्कार मिळत असतात. मुलांवर नेहमी अधिकार गाजवण्या ऐवजी त्यांच्याशी समरस व्हा आणि त्यांचे मित्र बनून त्यांच्याशी वागा हाच संवाद अपेक्षित आहे.

## विज्ञान धर्मग्रंथ हवा, या मताचे सावरकर अभिनेते शरद पोंक्षे यांचे प्रतिपादन

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर हे हिंदू राष्ट्रवादी होते. ते काँग्रेसमध्ये गेले नाहीत, हाच त्यांचा गुन्हा होता. हिंदू राष्ट्रवादाचा बुरखा फाडणारे पहिले व्यक्तिमत्व सावरकर हे होते. वेद, पुराण, कुराण आणि बायबल हे वंदनीय आणि पूजनीय आहेत, पण

काळानुसार अनुकरणीय आहेतच असे नाही, कारण काळानुरूप बदलत नाहीत त्यामुळे विज्ञान हा धर्मग्रंथ हवा, असे सावरकरांचे मत होते, असे प्रतिपादन सावरकरवादी आणि अभिनेते शरद पोंक्षे यांनी केले.

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था (नाशिक), पुणे केंद्र युवा आघाडीतर्फे स्वा. सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'स्वा. सावरकर विचार दर्शन' या पोंक्षे याच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड.अविनाश भिडे, विश्वनाथ भालेराव, मकरंद माणकीकर, अनिल शिदोरे, सुभाष सबनीस, परेश मेहेंदळे, मोहना गद्रे आदी उपस्थित होते.

वैचारिक मतभेद असले तरी आपण भारतीय एक आहोत. समोरच्याने शस्त्र उचलल्यावर आपण अहिंसक होऊन चालणार नाही. यामुळे आपण नाईलाजाने शस्त्र उचलावे, असा सावरकरांचा विचार होता. भारतीयाने भारतीयाचा खून करण्याच्या विरोधात सावरकर होते, त्यामुळे गांधी हत्येत सावरकर असणे शक्यच नाही आणि तसे न्यायालयात सिद्धही झाले आहे. असे मतही पोंक्षे यांनी व्यक्त केले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, समर्थ रामदास स्वामी, छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज यांना बदनाम करायचे आणि हिंदुत्वाची ताकद मोडण्याचे काम सध्या सुरू आहे. असा आरोपही पोंक्षे यांनी केला. मानसी फडके यांनी सूत्रसंचालन केले. मोहना गद्रे यांनी प्रास्ताविक केले. परेश मेहेंदळे यानी आभार मानले.

**रामरक्षा स्तोत्र आणि मारुती स्तोत्र पाठांतर स्पर्धा**

रामरक्षा स्तोत्र पाठांतर स्पर्धेमध्ये रंगुबाई जुन्नरे इंग्लिश मेडियम स्कूल तर मारुती स्तोत्र स्पर्धेमध्ये रचना विद्यालयाची बाजी...

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या रामरक्षा आणि मारुती स्तोत्र पाठांतर स्पर्धेमध्ये नाशिक जिल्ह्यातील विविध शाळांमधील इयत्ता तिसरी आणि चौथीच्या जवळपास ५७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. वेद पुराणे, उपनिषदे, स्तोत्रे आणि महाकाव्यानी समृद्ध असलेल्या भारतीय संस्कृतीची परंपरा महान आहे. तसेच आपल्या मराठी मनासाठी मारुती स्तोत्र आणि रामरक्षा ही स्तोत्रे लहानपणापासूनच संस्कार करणारी आहे. शारीरिक व्यायामाबरोबरच मनाचा व्यायाम होण्यासाठी पुरातन काळापासून अशी स्तोत्रे प्रत्येक घरामध्ये म्हटली जात होती. कालौघामध्ये याचे प्रमाण कमी कमी होत गेले.

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेने हे संस्कार दृढ व्हावे म्हणून रामरक्षा आणि मारुती स्तोत्र पाठांतर स्पर्धेचे आयोजन केले होते. मराठी इंग्रजी माध्यमातील विविध प्राथमिक शाळांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. इयत्ता तिसरी आणि चौथीचे विद्यार्थी अतिशय तन्मयतेने हि स्तोत्रे सादर करीत होती. काळाराम मंदिराच्या सभामंडपात झालेल्या रामरक्षा पाठांतर स्पर्धेचे पारितोषिक वितरण महंत सुधीरदास पुजारी तर अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या अभ्यंकर सभागृहात झालेल्या मारुती स्तोत्र स्पर्धेचे पारितोषिक वितरण श्री. शंतनू गुणे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. स्पर्धा झाल्यानंतर सर्व ५७५ विद्यार्थी तसेच शिक्षक पालक आणि उपस्थितांनी सामुहीक रामरक्षा आणि मारुती स्तोत्र म्हणून सांगता केली. या स्पर्धांच्या यशस्वीततेसाठी संस्थेचे अध्यक्ष ॲड.अविनाश भिडे, तसेच उदयकुमार मुंगी, अनिल देशपांडे,सुहास शुक्ल, प्रवीण कुलकर्णी, उल्हास पंचाक्षरी, सचिन पाडेकर, सुहास भणगे, धनंजय पुजारी, ॲड.समीर जोशी, महेश शुक्ल यांच्यासह



अमेय वैद्य, गौरी पर्वते, मीनाक्षी वैद्य, सुहासिनी बुरकुले,गौरी वैद्य, प्रसन्न पंडित, अजित कुलकर्णी,अनिल नांदुर्डीकर, अमोल लाळे, अवनी शुक्ल, अश्विनी पेशकार यांनी मेहनत घेतली या स्पर्धांचा निकाल पुढीलप्रमाणे.

**रामरक्षा पाठांतर स्पर्धा**

प्रथम पारितोषिक रंगुबाई जुन्नरे इंग्लिश मेडियम स्कूल, द्वितीय पारितोषिक न्यू ईरा स्कूल, तृतीय पारितोषिक आदर्श प्रायमरी इंग्लिश मेडियम स्कूल, उत्तेजनार्थ पारितोषिक नवीन मराठी शाळा

**मारुती स्तोत्र पाठांतर स्पर्धा**

प्रथम पारितोषिक रचना विद्यालय, द्वितीय पारितोषिक माधवराव लेले विद्यालय, तृतीय पारितोषिक शिशुविहार आणि बालक मंदिर मराठी माध्यम शाळा. उत्तेजनार्थ पारितोषिक न्यू ईरा इंग्लिश मेडियम

**रेडीओची एक सुरम्य आठवण....**

हे सगळं आपण अनुभवलंय....

ते परत एकदा जागवा...

आकाशवाणीचे हे मुंबई केंद्र आहे...

नमस्कार श्रोतेहो...!

मध्यम लहरी "तीनशेअठ्ठ्यात्तर अंश सात आठ मीटर्स अर्थात सातशेब्याण्णव किलोहट्र्झ" वर आकाशवाणीचे हे केंद्र आहे...किंवा “२३९.८१ मीटर म्हणजेच १२९१ किलोहट्र्ज“ वर आकशवाणीच्या केंद्रा वरून आम्ही बोलत आहोत...

सकाळचे पाच वाजून पन्नास मिनिटे व दहा सेकंद झाली आहेत आहेत... असा निवेदिकेचा मंजूळ स्वर कानी पडायचा आणि सनईचे सूर वाजायचे. कधी सांगली, कधी पुणे, तर कधी मुंबई केंद्र एवढाच काय तो फरक.

बाकी कार्यक्रम सगळीकडे तितकेच सुरेल आणि सुंदर ...

हे सगळं काय?..... तर एकेकाळचा “रेडिओ” आणि “आमचं जीवन”....

आज पुन्हा आठवलं नव्यानं.किती रम्य दिवस होते ते आणि अविस्मरणीय आठवणी..!! आठवण एवढ्याच साठी म्हटलं कारण आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात त्याचं एक वेगळ स्थान होतं

कारण त्या “रेडिओच्या” जमान्यात आपण लहानाचे मोठे झालो आणि हा रेडिओ म्हणजे आपल्या घराचा कुटुंबाचा एक सदस्य होता..

माझं बालपण हे दोन वेगवेगळ्या घरामधून गेलेलं. मातीच्या भिंती आणि काळ्या कौलाचं छप्पर असलेलं घर. बाहेरच्या खोलीतील एका भिंतीवरच्या कपाटात असायचा आमचा भला मोठा रेडिओ.

त्यानंतर दुसऱ्या घरात तो लाकडी फळीवर आला. त्याला जोडलेला एक स्पिकर बॉक्स स्वैपाकघरातपण असायचा. कालांतराने आमच्याकडे मर्फी चा ट्रान्सिस्टर पण आला, त्याला चामड्याच एक भक्कम कव्हर पण होतं आणि गळ्यात अडकावायला त्याला चामड्याचा एक पातळ पट्टा होता. त्या काळी रेडिओला वर्षाला सहा रुपये लायसन्स असायचे ....

आमचा हा रेडिओ इलेक्ट्रिक वर चालणारा असायचा आणि ट्रान्सिस्टर इलेक्ट्रिक आणि बॅटरी शेल दोन्हीवर चालायचा.... एकाचवेळी तीन शेल टाकावे लागायचे... तेव्हा फक्त एव्हरेडी कंपनीचे शेल मिळायचे.....असो..

असा हा आमचा रेडिओ सकाळी पाच वाजून पन्नास मिनिटांनी एका विशिष्ट धुन ने चालू व्हायचा.....

एक मिनिटाची ती धून बंद होताच...

आपोआप ‘’वंदे मातरम्” सुरु व्हायचा अन मग दिल्ली केंद्रावरुन प्रक्षेपित होणाऱ्या व पुणे केंद्राहुन सहक्षेपित हिंदी बातम्या प्रसारित व्हायच्या... — “ये (थोडा श्वास घ्यायचा,मग ) आकाशवाणी है ”अब देवकी नंदन पांडे से समाचार सुनिये”...हा आवाज म्हणजे तेव्हा देशाचा आवाज झाला होता...!!

एकदा बातम्या संपल्या कि मग प्रभात वंदन व लगेच भक्तीगीतांचा कार्यक्रम सुरु व्हायचा....

दिवसाची खऱ्या अर्थानं मंगलमय सुरुवात असायची ती...

घनश्याम सुंदरा, श्रीधरा अरुणोदय झाला....उठी लौकरी वनमाळी उदयाचळीं मित्र आला....

आनंदकंदा प्रभात झाली..उठी सरली राती...काढी धार क्षीरपात्र घेऊनी..धेनू हंबरती... लक्षीताती वांसुरेंहरी धेनुस्तनपानाला.....

या भूपाळी बरोबर लता मंगेशकर यांची “’रंगा येई वो रे...विठाई विठाई माझी कृष्णाई—कान्हाई $$”’ किंवा “पैल तोहे कावू कोकताहे, शकून गे माहे सांगताहे...”, ‘’भेटी लागी जीवा लागलेसी आस,...पाहे रात्रंदिवस वाट तुझी..” असं भक्तिमय संगीत चालू असायचं.

याला जोड म्हणून पंडित भीमसेन जोशी यांची "इंद्रायणी काठी देवाची आळंदी...लागली समाधी ज्ञानेशाची.." किंवा मोठी ताण आवळत “जे का रंजले गांजले’ त्यासी म्हणे जो आपुले...” अशी भक्ती गीते धीरगंभीर आवाजात ऐकू यायची.

बाबूजींचं 'समाधी साधन संजीवन नाम' हे ६ वाजून २० मिनिटांनी हटकून असायचच.

शाळेच्या दिवसात क्लास ला जाण्यासाठी हे गाणं झालं कि सायकलचं पायंडल मारायचं. घड्याळ कधीच बघावं लागत नव्हतं. बऱ्याच वेळा घड्याळ असायचं पण नाही. सगळं काही चालायचं ते रेडिओ वरच.

सकाळी चहाचा घोट घेत असताना ६:५५ ला संस्कृत बातम्या चालू व्हायच्या ते आम्हाला काही कळत नव्हतं पण दररोज ते सुरुवातीच पठण ऐकून “इयं आकाशवाणी । संप्रति वार्ता: श्रूयन्ताम् । प्रवाचकः बलदेवानन्द सागरः ।...” हे आमचं पाठ झाल होतं.....पुढे आम्ही कॉलेजला जाईपर्यंत किती तरी

वर्षे तोच आवाज होता..!!. संस्कृत कुणाला काही समजत नव्हते पण,

आतून आई चा आवाज मात्र यायचा...संस्कृत बातम्या झाल्या रे...आंघोळीला जा...

सकाळी सात वाजता पाच मिनिटाच्या हिंदी बातम्यांच्या सुरुवातीला बातमीदार एक आवंढा गिळून— ""ये (थोडा श्वास घ्यायचा, मग) आकाशवाणी है" अब सुब्रम्हण्यम स्वामी से समाचार सुनिये""

बरोब्बर सात वाजून पाच मिनिटांनी घोषणा ऐकू यायची...

"आकाशवाणी पुणे! सुधा नरवणे (किंवा भालचंद्र कुलकर्णी) आपल्याला प्रादेशिक बातम्या देत आहेत!!"— ठळक बातम्या... सुधा नरवणे आणि त्यांचा आवाज आजही आठवतो. अत्यंत स्पष्ट आवाजात आणि १० मिनिटात त्यावेळचे जग समजायचे.

सकाळी ८ वाजता हिंदीतून मग ८ वाजून १० मिनिटांनी इंग्रजी मधून दिल्ली केंद्रावरच्या बातम्या प्रसारित व्हायच्या. नंतर साडे आठ वाजता दिल्ली केंद्रावरून प्रसारित होणारे मराठी बातमीपत्र हे दत्ता कुलकर्णी, नंदकुमार कारखानिस, माधुरी लिमये, मृदुला घोडके त्यावेळी द्यायचे. आजही त्यांचे आवाज कानांत बसलेले आहेत.

८ वाजून ४० मिनिटांनी कधी नाट्यसंगीत तर कधी चित्रपट संगीत तर कधी भावगीते प्रसारित होत असत.

अकरा वाजता आकाशवाणी मुंबई ब केंद्रावरुन कामगार सभा हा चित्रपट गीतांचा कार्यक्रम लागायचा.... त्याकाळी शाहीर दादा कोंडके याचं लोकप्रिय झालेलं "मळ्याच्या मळ्यामधे कोण ग उभी" अन् "अंजनीच्या सुता तुला रामाचं वरदान अन एक मुखानं बोला बोला जय जय हनुमान" हि गाणी हटकून असायची....

ऐकून ऐकून आम्हा पोरांची ती गाणी तोंडपाठ झाली...!!

दुपारी बारा वाजता बाई माणसाची घरातील सर्व आवरा सावर झाली की, "माजघरातल्या गप्पा" हा कार्यक्रम चालू झाला की त्या प्रत्येकाला त्या गप्पा आपल्या घरातल्या गप्पा वाटायच्या...

सरु बाईंचा सल्ला हा घरातील वडिलधाऱ्या मंडळीने दिलेला सल्ला वाटायचा....

संध्याकाळी पुन्हा रेडिओचा ताबा मिळायचा....

साडेसहा वाजता "कामगारांसाठी" असा पुन्हा एक विरुंगळ्याचा कार्यक्रम लागायचा...

त्यात लोकसंगीत, लोकगीतं, कोळीगीत,भारुडे, अशा गाण्यांचा भरणा असायचा...

शाहीर विठ्ठल उमप, अनंत फंदी यांची कितीतरी गाणी त्यावेळी ऐकलीय — "बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडु नको—संसारामधी असा आपला, उगाच भटकत फिरु नको" हे गाणं आजही कानात गुणगुणतय..!!

संध्याकाळी साडेसहाला शेतकऱ्यांच्या साठी दररोज एक आपली शेती नावाचा अर्ध्या तासाचा प्रायोजित कार्यक्रम लागायचा.....

लहान असल्यानं शेतीतील कार्यक्रमाचा काहीच कळायचं नाही पण... "झुळझुळ वाणी.. खेळवा पाणी.. आणायचं कुणी.. सांगतो राणी... फिनोलेक्सनं आणलं पाणी, शेतं पिकली सोन्यावाणी.... फिनोलेक्स"...हि मध्येच वाजणारी जाहिरात बरोबर म्हणायचो...

संध्याकाळी सात वाजता मुंबई केंद्रावरुन मराठी बातम्या लागायच्या... वृत्तनिवेदका श्रीमती इंदुमती काळे आठवतात. बातम्यांची वेळ झाली कि शेजारी पाजारी गल्लीतले ज्यांच्याकडे रेडिओ आहे, त्यांच्या अंगणात गोळा व्हायचे अन कधी कधी वडीलधारी मंडळी कट्ट्यावर त्या बातम्या ऐकत बसायचे.....

मग गल्ली पासून ते अमेरिकेच्या अध्यक्षापर्यंत चर्चा व्हायची. अमेरिका आणि रशियाने काय करायला हवे याचा हि सल्ला दिला जायचा वडीलधाऱ्या मंडळींकडून.

रात्री ८ वाजता दिल्ली केंद्रावरच्या इंग्रजी मधून क्रीडा बातम्या असायच्या आणि बरोबर ८ वाजून ५ मिनिटांनी दिल्ली केंद्रावरच्या मराठी बातम्या...आणि आकाशवाणी दत्ता कुलकर्णी (किंवा नंदकुमार कारखानिस) आपल्याला बातम्या देत आहेत ....." असा दमदार आवाज घरात घुमायचा..

घरातील लोकांची जेवणं व्हायची तोपर्यंत नऊ वाजलेले असायचे मग नभोवाणी आणि मित्रमंडळ सादर करत आहे एक नाटिका... असा एक श्रवणीय अर्ध्या एक तासाचा नाट्यप्रयोग लागायचा....

ते ऐकत असताना आपण प्रत्यक्ष ते नाटक अनुभवतोय असं भास व्हायचा.....

तोर्यंत घरात अंगणात/घरात गाद्या, गिरद्या, गोधड्या, वाकळ असं काही बाही टाकून झोपण्याची तयारी केलेली असायची अन नेमकं त्याच वेळी जुन्या हिंदी गीतांचा कार्यक्रम चालू व्हायचा.... मग मोकळ्या हवेत अंथरुणावर लोळत पडत ही सुमधुर श्रवणीय गाणी ऐकत कधी झोपी जायचो ते कळत पण

नसायचं....!!

असाच रात्री ९ वाजता प्रसारीत होणारा आणखी एक साप्ताहिक लोकप्रिय कार्यक्रम मराठी चित्रपट संगीताचा कार्यक्रम "आपली आवड" की ज्यात पत्राने लोक मराठी गाणी आकाशवाणी केंद्राला कळवायचे आणि मग ज्या गाण्यासाठी जास्त पत्रं आलीत ती गाणी मग आपल नावं घेवून त्या कार्यक्रमात लावली जायची....!!

सूर्य मावळतीला गेल्यावर संध्याकाळी सांजधारा म्हणून एक भावगीतांचा कार्यक्रम चालू व्हायचा "अशी पाखरे येती, आणिक स्मृती ठेवुनी जाती" किंवा ''संथ वाहते कृष्णामाई, तीरावरल्या सुख दुःखाची जाणीव तिजला नाही..... संथ वाहते कृष्णामाई'' ही आणि अशी अनेक अरुण दाते आणि सुधीर फडके यांनी गायलेली भावगीते आजही मनात घर करून उभी आहेत..!

असाच एक साडेनऊ वाजता रेडिओवर 'गम्मत-जम्मत' हा लहान मुलांचा कार्यक्रम लागायचा.... 'गम्मत जम्मत. या या या गम्मत जम्मत. ऐका हो गम्मत जम्मत. या या या ढिण्चॅक ढिण्ण, ढिण्चॅक ढिण्चॅक ढिण्ण' अशी त्या शिर्षक गीतानं कार्यक्रमाची सुरुवात व्हायची.... त्यातलं शेवटचे 'गम्मS S S S त जम्मS S S S त' हे शब्द कानावर आले कि आम्ही मुलं हात वर करून ते शब्द त्या रेडिओ सोबत म्हणायचो...!!

शनिवारी रात्री साडेनऊला नाटकांचे, कादंबरीचे नभोवाणी रुपांतर चांगले असायचे.

तेंव्हा रेडिओवर जास्त करून मराठी कार्यक्रमच ऐकले जायचे.

मराठी सिने संगीत, शास्त्रीय संगीत, श्रुतिका, चर्चा, किर्तनं, बाजारभाव इत्यादी इत्यादी. पैकी रात्रीची 'टेकाडे भाऊजींची' श्रुतिका, रात्रीची आपली आवड हे अगदी न चुकवायचे कार्यक्रम. हिन्दी कार्यक्रम ऐकायचेच नाही असेही नाही.

दुपारी अडीच वाजता विविध भारती, त्यातील 'फौजी भाईयों कि खिदमत में' सादर होणाऱ्या कार्यक्रमात येणाऱ्या मोठेमोठ्या निर्माते, दिग्दर्शक, हिरो - हिरॉइन्स वगैरे ग्लॅमरस व्यक्तींना प्रत्यक्ष 'ऐकायला' मिळायचं. गाणी तर सुंदर असायचीच.

दर बुधवारी रात्री ८ वाजता रेडिओ सिलोनवर लागणारी "बिनाका गीत माला" हा कोणतं गाणं या आठवड्यात किती नंबरला आहे... याबाबतचा एक तासाचा कार्यक्रम लागायचा....

त्यात ते अमिन सायानीचे निवेदन... "भाईयो और बहेंनो, तो चलो देखते है, इस हप्ते में पायदान नंबर चार पे कौनसा गाना है.."

हे असं त्यांनी म्हंटल कि, आमच्या घरामध्ये त्या गाण्यावरुन पैजा लागायच्या.....कोण जिंकतंय कोण हरतयं यापेक्षा आपला अंदाज बरोब्बर आल्याचा आनंद अधिक असायचा.....तो अमीन सयानी म्हणजे प्रत्येकाला आपल्या घरातील माणूस वाटायचा... इतकं जिवंत ते सादरीकरण कानाला अन मनाला भावायचं..!!

बिनाका गीतमालाचा वार्षिक कार्यक्रम म्हणजे गाण्यांची मेजवानीच. आमच्या काळातल्या गाण्यांशी आमचं भावविभोर विश्व निगडीत होतंच की! आम्ही कागद-पेन घेऊन ती यादी लिहून काढायचो. वषभरातल्या आपल्या आवडत्या गाण्यांशी ती ताडून पाहायचो. अमीनभाईंचा आश्वासक, आपलासा वाटणारा आवाज, ती गाणी! ते गायक! व्वा! असे दिग्गज कलाकार ज्या शतकात जन्मले, त्याच शतकात आपलाही जन्म झाला आहे, या सुखद जाणिवेनं आजही किती कृतकृत्य वाटतं.

रात्री सव्वानऊला 'ईगल फ्लास्क' प्रस्तुत इन्स्पेक्टर ईगल ह्यांची विनोदी मालिका लागायची तर 'हवामहल' कार्यक्रमात वेगवेगळ्या पुरातन ऐतिहासिक वास्तू स्वतः इतिहास कथन करायच्या.

फौजी भाईयों की पसंद के फिल्मी गाने!' जिवाचा कान करून ऐकायचो. या कार्यक्रमासोबत मदमस्त गाण्यांचा जो सिलसिला सुरु व्हायचा तो थेट रात्रीपर्यंत (काय हो? ते झुमरीतल्लैया नेमकं कुठल्या राज्यात आहे बरं!).

सर्वचजण 'बेला के फूल' हा कार्यक्रम संपताच निद्रादेवीची आराधन करायचे आणि सरतेशेवटी रेडिओ बंद व्हायचा.

तुमच्याहि रेडिओच्या काही आठवणी नक्की असतील..... या आणि अशा कितीतरी रेडिओच्या आठवणी मनात आजही घर करून उभ्या आहेत......

निर्जीव असला तरी, घराघरातील तो एक हक्काचा आपलेपणाचा सदस्य होता.....

एकवेळ आपण चुकू पण तो कधीच चुकत नव्हता...... टीव्ही च्या काळात जरी डोळे सुखावले असले तरी पण कान आणि मन मात्र त्या जुन्या आठवणीत गुरफटुन राहिले....

हा रेडिओच आमचा सुख-दु:खाचा साथी होता. ह्या सर्व गोष्टींची चमचमती झालर लाभलेलं आमचं बालपण

आठवलं की अजूनही मन हळवं होतं. खूप काही लिहावं वाटतं, पण शब्दाला खरंच मर्यादा पडल्या आहेत म्हणून आता इथंच थांबतो. पण पुढच्या आठवड्यात रेडिओ वरच्या आणखी काही आठवणी घेऊन येईन...

अजून बऱ्याच गोष्टी लिहायच्या आहेत... तोपर्यंत तुम्हीही जागवा तुमच्या त्या रम्य आठवणी आणि डुंबून जा त्यामध्ये.

## मानाचा तुरा
## सुवर्णक्षणाचे साक्षीदार
## पुण्य नगरीची शान
### अपराजीत श्रीमंत बाजीराव पेशवे यांची ताठ मान



सांगण्यास अत्यंत आनंद होतोय की पुण्य नगरीच्या ईतिहासात , श्रीमंत बाजीराव प्रतिष्ठानचे वतीने अध्यक्ष श्री. भुषण गोखले यांचे अध्यक्षतेखाली आणि सेक्रेटरी श्री. कुंदनकुमार साठे यांचे अथक प्रयत्नाने अपराजीत श्रीमंत बाजीराव पेशवे यांचा ४ टन वजनाचा ( ४००० किलो) ६५,००,०००/– लाख रुपये कीमतीचा पुतळा एन. डी. ए. येथे बसविण्यात आला. पुतळ्याच्या बाजुचे सुशोभीकरणाचे काम साधारण दिड महिन्यात पुर्ण होईल. साधारण दोन महिन्यांनी लोकार्पण सोहळा करण्यात येणार आहे. कुंदनजी साठे साहेब आम्हाला आपला सार्थ अभिमान वाटतो. आपले त्रिवार अभिनंदन









**देशभक्त स्वा.सै.विर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्ताने करमाळा केंद्राच्या वतीने साप्ताहिक फिटनेस कँप चे उदघाटन करण्यात आले.**



करमाळा प्रतिनिधी 23 फेब्रुवारी ते 2 मार्च समंत भद्र गुजर गल्ली करमाळा येथे फ्री फिटनेस शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.हॅप्पी माईंड हॅप्पी हेल्थ या संस्थेचे अध्यक्ष महेश वैद्य फिटनेस कोच मुंबई हे या फिटनेस शिबिरात मार्गदर्शन करणार आहेत.हरीश जी लटूरे उद्योजक हे आवर्जून उपस्थित राहणार आहेत...कोरोना महामारी नंतर शारीरिक व्यायाम चे महत्त्व लोकांना समजले आहे त्यासाठी योग्य व्यायाम आणि संतुलित आहार याची गरज आहे.त्यासाठी किमान 45 मिनिटे व्यायाम करणे आवश्यक आहे.ग्रामीण भागामध्ये याचा प्रसार व्हावा यासाठी हॅप्पी माईंड हॅप्पी हेल्थ चे अध्यक्ष फिटनेस ट्रेनर महेश वैद्य हे फिटनेस शिबिराचे आयोजन करीत आहेत...याचा लाभ सर्वांनी घ्यावा.जेणे करून आपले शरीर मजबूत फिट राहील .Happy mind Happy Health Mumbai आणि अखिल ब्राम्हण मध्यवर्ती संस्था नाशिक शाखा करमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे.शरिराची रोग प्रतिकार शक्ती वडविण्यासाठी नित्य व्यायाम ची गरज आहे. व्यायाम हा प्रकार सर्वांना माहिती आहे पण तो कसा करावा किती वेळ करावा याची सांगड घालणं आवशयक आहे.त्यासाठी हॅप्पी माईंड हॅप्पी हेल्थ मुंबई चे अध्यक्ष फिटनेस कोच विक्रमवीर महेश वैद्य हे विविध ठिकाणी फिटनेस शिबिराचे आयोजन करीत आहेत.विशेषत: 10 ते 16 वयोगट आणि 40+ स्त्री आणि पुरूष यांच्या फिटनेस कडे लक्ष देणे आवश्यक आहे .गेली 25 वर्षे





महेश वैद्य हे फिटनेस कोच म्हणून कार्यरत आहेत. आदरणीय विनोद कुमार गांधी हे महेश वैद्य यांचे गुरू आहेत. त्यांच्या मार्गदर्शनखाली महेश वैद्य यांनी अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत.7777 जोर (पुश अप्स ) साडेचार तास सतत मारण्याचा विक्रम प्रस्थापित केला...करमाळा नगरपरिषद तर्फे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी करमाळा नगरपरिदेच्या 125 वर्षे पूर्ण झाली या निमित्ताने करमाळा भूषण पुरस्कार तत्कालीन नगराध्यक्ष गिरिधरदास देवी यांच्या शुभ हस्ते प्रदान करण्यात आला होता...सध्या स्त्री आणि पुरुषानं मध्ये अनेक प्रकारची व्याधी जडतात उदा.. मधुमेह , ब्लड प्रेशर स्नायू कमजोर होणे... चयापचय क्रिया मंदावणे शरिराची लवचिकता कमी



होणे या प्रकारची लक्षणे दिसून येतात परिणामी रोगप्रतिकार शक्ती कमी होते.आनंदीचे मालक बाळासाहेब होसिंग आणि भाऊसाहेब फुलारी, राजेंद्र जगताप कलासिक ऑईल कंपनी चे मालक संतोष कुलकर्णी , अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था चे सर्व सदस्य तसेचअखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था करमाळा महिला आघाडी व युवा आघाडी उद्योजक विनोद कुमार गांधी, संतोष कुलकर्णी सर महेश दोशी, मित्रवर्य किसन कांबळे सर संजय राजे घोरपडे सर यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.



## स्वातंत्र्य लढ्यातील कार्याविषयी व्याख्यान

रविवार दिनांक २६/०२/२०२३ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या ५७वया पुण्यतिथी निमित्त निरा केंद्राच्या वतीने त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील कार्याविषयी व्याख्यान निरा शिवतकरार ग्रामपंचायतीच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते यावेळी प्रमुख पाहुणे श्री डॉक्टर देविदास वायदंडे सर प्राचार्य मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय यांची निवड करण्यात आली श्री दत्तात्रय बडबडे केंद्र प्रमुख नीरा यांनी प्रस्तावना करताना केंद्राच्या वतीने २०२२/२०२३ सालात केलेलीं कामे व भगवान परशुराम यांचे जयंतीच्या निमित्ताने इयत्ता पहिली ते पाचवीच्या शालेय विद्यार्थ्यांच्या रामरक्षा मनांचे श्लोक व आरत्या पाठांतर स्पर्धा



घेऊन यशस्वी विद्यार्थ्यांना पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे सर्व सदस्य मान्यवर व देणगीदार व हितचिंतक यांचाही या संयुक्त कार्यक्रमात यथोचित सन्मान करण्यात आला परसतावनेनंतर श्री निखिल बेलसरे यांनी सुत्र संचालन केले प्रमुख वक्ते श्री डॉक्टर नारायण मधुकर राजूरवार सर प्राध्यापक मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय यांचा सतकार करण्यात आला वैद्यकीय व्यवसायातील कामगिरी बद्दल



सौ डॉक्टर मनोती अभय तळवलकर यांचा शारदा पुरस्काराने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह व पेन देउन गौरविताना



त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले श्री अमोल वसंतराव देशपांडे यांचा औषधी शास्त्रातील पदवी गुणवत्तेने प्राप्त केल्याबद्दल त्यांना परशुराम पुरस्काराने सन्मानित करुन स्मृतिचिन्ह शाल श्रीफळ व पेन देउन गौरविताना त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले . प्रमुख वक्ते श्री राजूरवार सर यांनी थोडक्यात सावरकर यांच्या कार्याविषयी व नाटक व कवी यांबद्दल सभागृहात मौलिक विचार मांडले व सर्वांनी ते मनापासून ऐकून घेतले शेवटी



प्राचार्य श्री देविदास वायदंडे सर यांनी मनोगत व्यक्त केले आभार व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली आभार प्रदर्शन श्री प्रसाद कामतकर यांनी केले जय भगवान परशुराम जय महाराष्ट्र व जय हिंद



पुणे केंद्र

# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पुणे केंद्र व समाज सहाय्यक संस्था आयोजित

• रजि. नं. इ-२८२ •

१२७३, सदाशिव पेठ, नवा विष्णू चौक, बाजीराव रोड जवळ, पुणे ४११०३०.



# महिला उत्पादित वस्तू प्रदर्शन व विक्री आणि खाद्य केंद्र

• ८ व ९ एप्रिल २०२३ • सकाळी १० ते रात्री ९ वा.

## • स्थळ •

**कोहिनूर मंगल कार्यालय**

३४/१२ एरंडवणा, प्रभात रोड, गल्ली नं.८, गरवारे कॉलेजवळ, पुणे ४.

## • संपर्क •

| नीता पारखी | सुवर्णा रिसबुड | अनघा जोशी | सुजाता मवाळ |
|---|---|---|---|
| ८८०५८४३०३० | ९७६३०७५४३४ | ९६०७२१३२२० | ९७६७५८८२२३ |

### स्त्री आहे अमृताचा घडा

स्त्री शिवाय अपूर्ण आहे
जगातील प्रत्येक घर,
सृष्टी निर्मितीसाठी दिला
परमेश्वराने सुंदर वर...

वात्सल्याचं प्रतीक अन
सुख दुखाची साऊली
जन्म घेतो जिच्या पोटी
धन्य धन्य ती माऊली..

चूल मुल सांभाळून
स्वकर्तृत्वावर घेते भरारी,
दगडालाही फोडे पाझर
नात्यांचा उत्सव नारी...

विश्वासाच्या नात्याला स्त्री
जातीची सुंदर झालर,
सावित्रीच्या लेकी आम्ही
मायेची घालतो पाखर..

घराघरातील नारी म्हणजे
अंगणातील प्राजक्ताचा सडा,
फिरुनी नवा जन्म घेण्या
स्त्री आहे अमृताचा घडा..

**कवयित्री**

**सौ. अलका शरद रसाळ**

बारामती, पुणे

# संस्थेची कार्यालये

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक**



तिवधा, शुक्ल वाडा जुने नाशिक ,
केंद्र प्रमुख :श्री. महेश गंगाधर शुक्ल.
मो. ९८८११२४१४४

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पंचवटी, नाशिक**



मखमलाबाद नाका राजपाल कॉलनी,
कृशाकुंज बंगला , मधुबन कॉलनी,
पंचवटी, नाशिक ४२२००३
केंद्र प्रमुख : श्री. चंद्रशेखर अशोक जोशी.
मो. ९३७००६६६२८

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, लोणंद (ग्रामीण )**



लोणंद, भादे ता. खंडाळा,
जि. सातारा. ४१५ ५२६
केंद्र प्रमुख : श्री. प्रकाश विनायक देशपांडे
मो: ९८६०८७४२३७

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, शिरवळ**



रा. लक्ष्मी नगर , बँक ऑफ महाराष्ट्र शेजारी,
मु. पो. शिरवळ , ता. खंडाळा,
जि. सातारा ४७१२८०१
केंद्र प्रमुख.: मदनमोहन भालचंद्र गोखले
मोबाईल:९७६४२२० ३७६

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पुणे**



१२७३, सदाशिव पेठ, गुजराती बिल्डिंग,बाजीराव रोड लागत, नवा विष्णू चौक, पुणे ४११०३०
केंद्र प्रमुख : श्री. मकरंद माणकीकर.
मो. ९७६३१९१२०० ०२० २४४३६९२२

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, फलटण**



११८, कसबा पेठ, फलटण, जि. सातारा,
केंद्र प्रमुख :श्री.. भालचंद्र दत्तात्रय ताथवडकर
मो. ९८६०७२८६९८.

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, जुन्नर**



घर नं ३७, वरली आळी, श्रीराम मंदिर,
ता. जुन्नर, जिल्हा पुणे ४१०५०२
केंद्र प्रमुख : श्री. हरीष शांताराम भवाळकर.
मो ९८८१६६६१९५

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नीरा**



वार्ड २, समर्थ बंगला ,बाजार तळ,मराठी शाळे मागे नीरा, ता. पुरंदर जि पुणे ४१२१०२
केंद्र प्रमुख : श्री. दत्तात्रय त्रिंबक बडबडे
मोबाईल:९८२३३२६६८४,

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, करमाळा**



प्लॉट नं.२६.कमलादेवी औद्यागिक सहकारी वसाहत
ता. करमाळा. जिल्हा .सोलापूर ३१३२०३
केंद्र प्रमुख. संतोष मुरलिधर कुलकर्णी.
मोबाइल : ८२७५४४८०६९

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, आकलूज**



मु. पो. यशवंत नगर , ता. मळशिरस,
आकलूज , जि. सोलापूर
केंद्र प्रमुख : श्री. विजय वसंत कुलकर्णी
मोबाइल : ७२४९२९०००४

# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था आणि समाज सहाय्यक संस्था, नाशिक

रजि. नं. इ-२८२

## कार्यकारिणी


ॲड. श्री. अविनाश जनार्दन भिडे
अध्यक्ष


श्री. चंद्रशेखर रामचंद्र जोशी
उपाध्यक्ष


श्री. कुंदनकुमार यशवंत साठे
उपाध्यक्ष


श्री. उदयकुमार दत्तात्रेय मुंगी
कार्याध्यक्ष


श्री. सुभाष प्रभाकर सबनीस
कार्यवाह


श्री. अनिल मोहिनीराज देशपांडे
कोषाध्यक्ष


सौ. मानसी अनिरुद्ध फडके
सदस्य


श्री. सुहास गोपाळ शुक्ल
आधारस्तंभ


श्री. गंगाधर नारायण कुलकर्णी
आश्रयदाते


डॉ. श्री. सचीन सुरेश पाडेकर
देणगीदार


श्री. प्रवीण प्रह्लाद कुलकर्णी
सदस्य


श्री. उल्हास एकनाथ पंचाक्षरी
सदस्य


श्री. समीर चिंतामणी जोशी
सदस्य


श्री. सारंगधर गोपाल अभ्यंकर
सदस्य


श्री. अनिल प्रभाकर शिदोरे
सदस्य


श्री. परेश यशवंत मेहेंदळे
सदस्य


सौ. संयोगीता नितीन पागे
सदस्य


श्री. मुकुंद लक्ष्मण राक्षे
सदस्य


श्री. चंद्रशेखर मधुकर दाणी
सदस्य


श्री. सुभाष शंभुराव कुलकर्णी
सदस्य